दूरध्वनी क्रमांक :
०२०-२५६२१४४५

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

परीक्षा विभाग
गणेशखिंड, पुणे ४११००७
Website :www.unipune.ac.in
email : sssapp-coord@pun.unipune.ac.in

संदर्भ: परीक्षा समन्वय/ १८८

दिनांक : १३ /०६/२०२२

प्रति,

मा. प्राचार्य / संचालक,

सर्व संलग्न महाविद्यालये / मान्यता प्राप्त संस्था,

अहमदनगर, नाशिक व पुणे,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,

पुणे - ४११००७

विषय :- सन २०२२ च्या प्रथमार्धात मार्च / एप्रिल २०२२ (आयोजन जून / जुलै / ऑगस्ट २०२२) होणाऱ्या विद्यापीठाच्या विविध परीक्षांसाठी वरिष्ठ पर्यवेक्षकांच्या नियुक्त्या करणेबाबत.

महोदय / महोदया,

उपरोक्त विषया संबंधी कळविण्यात येते की, विद्यापीठाच्या विविध परीक्षांसाठी अंतर्गत वरिष्ठ पर्यवेक्षकांची नेमणूक संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यानी करावयाची असून त्या बाबत ची सविस्तर माहिती विद्यापीठास कळवावयाची आहे. या संदर्भात निर्गमित केलेला अध्यादेश क्रमांक ८ (४ ते ९) मधील तरतूदीकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

उपरोक्त संदर्भात विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार अंतर्गत वरिष्ठ पर्यवेक्षक (Internal Senior Supervisor) नियुक्तीचे निकष पुढील प्रमाणे निश्चित केलेले आहेत. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

१. अंतर्गत वरिष्ठ पर्यवेक्षक म्हणून नेमणूक करताना प्राधान्याने नियमित शिक्षकांची नेमणूक करावी. वरिष्ठ पर्यवेक्षक म्हणून नेमणूक होण्यासाठी वरिष्ठ महाविद्यालयामध्ये शिकविण्याचा किंवा प्रशासकीय कामकाजाचा किमान तीन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. प्रशासकीय कामकाजाचा अनुभव असणारा शिक्षकेतर कर्मचारी किमान गट ' ब ' ( वर्ग २) मधील असावा.

२. अंतर्गत वरिष्ठ पर्यवेक्षक म्हणून नेमणूक करण्यात यावयाच्या शिक्षकांस विद्यापीठाची शिक्षक मान्यता असणे आवश्यक आहे.

विद्यापीठाने बहि:स्थ वरिष्ठ पर्यवेक्षक म्हणून नियुक्त केलेली व्यक्ती परीक्षा केंद्रावर येवू न शकल्यास अन्य संस्थेच्या महविद्यालयाच्या प्राचार्यांशी संपर्क साधून त्यांच्या वरिष्ठ महाविद्यालयातील कमीत कमी तीन वर्षाचा शिकविण्याचा अनुभव असलेल्या नियमित शिक्षकास बहि:स्थ वरिष्ठ पर्यवेक्षक म्हणून बोलवून घ्यावे व तशी नियुक्ति करावी. नियुक्ति पत्र प्राचार्यांनी द्यावे व त्याची प्रत विद्यापीठाकडे या sssapp-oord@pun.unipune.ac.in ई-मेल वर पाठवावी. ई-मेल पाठवताना subject मध्ये revised ss appointment असा उल्लेख करावा. तसेच सदर व्यक्ती मान्यताप्राप्त शिक्षक असणेही आवश्यक आहे. अशा प्रकारे महाविद्यालयांनी पर्यायी व्यवस्था म्हणून नियुक्त केलेल्या बहि:स्थ वरिष्ठ पर्यवेक्षकास विद्यापीठाकडून वेगळे नेमणूक आदेश दिले जाणार नाहीत. या बाबतची हार्ड कॉपी विद्यापीठामध्ये आणून देण्याची आवश्यकता नाही. आपणास विनंती करण्यात येते की, विद्यापीठाच्या परीक्षांसाठी वरीलप्रमाणे बहि:स्थ पर्यवेक्षकांच्या नेमणूकीबाबत नियोजन करावे. तसेच अंतर्गत पर्यवेक्षकांच्या नियुक्त्या करुन विद्यापीठास परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी नेहमीप्रमाणे सहकार्य करावे.

पुढे आपणास असे कळविण्यात येते की, आपल्या महविद्यालयातील ज्या प्राध्यापकांची विद्यापीठाकडून बहि:स्थ वरिष्ठ पर्यवेक्षक म्हणून नेमणूक केली जाईल त्यांना संबंधित कालावधीसाठी आपल्या महाविद्यालय / मान्यताप्राप्त संस्थेतून कार्यमुक्त करावे.

कळावे,

संचालक

परीक्षा व मूल्यमापन मंडळ